**<u>व्दितीयपक्षातर्फे साक्षीदार क्र. 2 ची साक्ष</u>**
**<u>शपथेवर साक्षीदाराची पुढील सरतपासणी – श्री.बी. आर. कावरे यांच्याव्दारा</u>**

**01.** मी निशाणी यु–171 वर माझे पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यावर माझी सही आहे. मी अभिलेखावर यादी निशाणी यु–11 सोबत अनुक्रमाक 782 वर माझी वैयक्तिक माहिती जी प्रथमपक्षाने ठेवली होती ती दाखल केलेली आहे, त्याला निशाणी **<u>यु–221</u>** देण्यात आले. अनुक्रमांक 783 ते 792 वर व्हाउचर्स च्या प्रती दाखल केलल्या आहेत. (सदर दस्तांना निशाणी क्रमांक देण्यास प्रथमपक्षाच्या वकीलांनी हरकत घेतली. त्यांच्या कथनानुसार सदर दस्त साक्षीदाराने तयार केलेले नाहीत, त्यावर त्याच्या सहया नाहीत, त्यामुळे त्यांना निशाणी क्रमांक दिला जावु शकत नाही.) हरकत कायम ठेवुन सदर दस्तांना एकत्रितरित्या निशाणी क्रमांक **<u>यु–222</u>** देण्यात आले.
सरतपास – पुर्ण...

**<u>उलटतपास – प्रथमपक्षातर्फे विधीज्ञ श्री. पी.एल.शहाणे यांचेव्दारा</u>**

02. ज्या जाहीरातीला अनुसरुन मी नियुक्तीकरीता अर्ज दाखल केला होता ती जाहिरात मी दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, बॅंकेने संदेशवाहक यापदासाठी कुठलीही जाहिरात वृत्तपत्रात प्रसिध्द केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मला मुलाखतीकरीता बोलाविण्यात आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी बनावट मुलाखतीचे पत्र दाखल केलेले आहे. संदेशवाहक या पदाचे कामाचे तास निश्चीत आहेत की नाही ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, कायम कर्मचारी ज्या दिवशी रजेवर राहायचे त्यावेळेसच मला कामावर बोलाविले जात होते. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्या दिवशी कामावर जायचो त्या दिवसाचा पगार मला मिळायचा. हे म्हणणे खरे नाही की, बॅंकेने निवड समितीचे गठन केलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, निवड समितीच्या अधिका–यांची नावे व पद मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, निवड समितीबाबत खोटा मजकूर मी माझ्या पुराव्याच्या शपथपत्रात नमूद केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, बॅंकेने माझी नियुक्ती चतुर्थश्रेणी कर्मचारी म्हणुन केलेली नाही, साक्षीदार सांगतो की, संदेशवाहक म्हणुन नेमणुक केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी परिच्छेद क्र.4 मधील मजकूर खोटा लिहीला आहे.

03. माझे शिक्षण 10 व्या वर्गापर्यन्त झालेले आहे. शपथपत्रातील मजकूर मी माझ्या वकीलांना सांगीतला होता, त्यांनी तो तयार केला व त्यावर मी सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, शपथपत्रातील मजकूर मला समजावुन सांगण्यात आला

नव्हता. हे म्हणणे खरे नाहीं कीं, मीं निशाणी यु–221 व यु–222 वर खोटीं माहितीं व व्हाउचर्स दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाहीं कीं, बॅंकेच्या विलीनीकरणानंतर कार्यरत असलेल्या कर्मचा–यांना नविन बॅंकेत त्याच पदावर समायोजन करण्याचीं तरतूद नाहीं. समायोजन म्हणजे काय ते मला सांगता येणार नाहीं. हे म्हणणे खरे नाहीं कीं, दि.25.03.2008 चीं अधिसुचना रोजंदारीं कर्मचा–यांना लागू नाहीं. हे म्हणणे खरे नाहीं कीं, माझीं 240 दिवसाचीं अखंड सेवा झाल्याचे मीं खोटे कथन केलेले आहे. हे म्हणणे खरे नाहीं कीं, 240 दिवस सेवा झाल्याबाबतचा पुरावा मीं सादर केलेला नाहीं. बॅंकेने काढलेले परिपत्रक, ठराव यांचा उल्लेख मीं परिच्छेद क्र.2 मध्ये केला आहे, परंतु त्याच्या तारखा मला सांगता येणार नाहीं. हे म्हणणे खरे नाहीं कीं, मीं या प्रकरणात खोटे दस्तऐवज दाखल केलेले आहेत. हे म्हणणे खरे नाहीं कीं, मीं बॅंकेच्या अटीं पुर्ण करत नसल्यामुळे कायम कर्मचारीं म्हणुन मला नियुक्तीं देता येणार नाहीं. हे म्हणणे खरे नाहीं कीं, माझ्या कामाचे स्वरुप हे कायमस्वरुपीं कामगाराप्रमाणे आहे असे मीं खोटे सांगत आहे.

04. सन 2018 मध्ये मीं औरंगाबाद शाखेत, ता.जि.औरंगाबाद शाखेत कार्यरत होतो. हे म्हणणे खरे नाहीं कीं, मीं चतुर्थश्रेणीं कर्मचा–याप्रमाणे काम करत नाहीं. हे म्हणणे खरे नाहीं कीं, वर्ग–4 च्या कर्मचा–यांचे काम व माझे काम यात फरक आहे. हे म्हणणे खरे नाहीं कीं, मीं परिच्छेद क्र.4 मध्ये बॅंकेविरुध्द खोटे आरोप केलेले आहे. हे म्हणणे खरे नाहीं कीं, मीं खोटे शपथपत्र दाखल केलेले आहे.

उलटतपास – पुर्ण...

फेरतपास – नाहीं.

**श्रवणोत्तर स्विकृत**

सहीं/–

दिनांकः 21.08.2023
ठिकाणः औरंगाबाद

(एस.एस.सहस्त्रबुध्दे)
न्यायाधीश,
2रे कामगार न्यायालय क्रं.2, औरंगाबाद.